# अधिष्ठाता ,शासकिय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा,नांदेड

## निविदा सुचना

शासकिय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा,नांदेडसाठी सन २०१०-११ या वर्षात रसशाळेत औषधी उत्पादन करण्याकरीता आयुर्वेदिक व युनानी कच्ची द्रव्ये खरेदी करिता व्दि-लिफापा पध्दतीने मोहर बंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | निविदेचा तपशिल | अंदाजित खरेदी | बयाना रक्कम | को-या निविदेची किंमत | को-या निविदा फॉर्म विक्री दिनांक | पुर्ण भरलेल्या निविदा स्विकारण्याचे अंतिम तारी ख व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | आयुर्वेदिक व युनानी कच्ची द्रव्ये | १५ लाख | ५०००/- | १५००/- | दि.०५.०२. २०१०पासून दि.२५.०२. २०१० सायं . ५.३० वा पर्यंत ( सार्वजनिक व स्थानिक सुटी वगळून) | दि.२५.२.२०१० सायं ५.३० वा पर्यत |
| २. | पॅकिंग मटेरियल काचेच्या बॉटल्स / प्लास्टीक बॉटल्स /लाकाडी खोके /कोरोगेटेड बॉक्स इ. | रु ३लाख | ५०००/- | ७५०/- | .....//..... | .....//..... |

**अटी व शर्ती :-**

१) निवेदेच्या अटी व शर्ती आणि कच्ची औषधी द्रव्ये व पॅकीग मटेरियलचे विनिर्दिष्टये (स्पेसीफिकेशन) निविदा अर्जासोबत पुरविण्यात येते. निविदा अर्जामध्ये नमूद केलेल्या अटी ,शर्ती व तसेच स्पेसिफिकेशन प्रमाणे कच्ची द्रव्ये पॅकीग मटेरियलचा पूरवठा करणे बंधनकारक राहिल.

२) निविदा अर्जाची कोरे फॉर्म अधिष्ठाता,शासकिय आयुर्वेदिक व यूनानी रसशाळा,नांदेड यांच्या कार्यालयात दिनांक ०५.०२.२०१० ते दिनांक २५.०२.२०१० पर्यंत रविवार , दुसरा व चौथा शनिवार आणि सार्वजनिक सुटया वगळून मिळतील. निविदा अर्जाची किंमत व निविदासोबत भरावयाची इ.एम.डी.ची रक्कम वर दर्शविण्यांत आली आहे.

३) लिफापा उघडण्याची वेळी निविदा धारक किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणे आवश्यक आहे. मोहरबंद निविदा हस्त वटवडयाने स्विकारले जातील. पोस्टाने पाठविणा-या निविदाधारकांनी आपल्या निविदा पंजीकृत डाकेने (रजिस्टर,ए.डी. किंवा स्पीड पोस्ट) ठरविलेल्या वेळेच्या आत पाठवाव्यात. पोस्टाच्या दिरंगाईमूळे निविदा उशीरा प्राप्त होण्याच्या कालावधी क्षमापीत केला जाणार नाही.

४) को-या निविदा पोस्टाने पाठविण्यासाठी रुपये १००/- फक्त अधिक पोस्टाचे खर्च पाठवावे लागतील. निविदा फॉर्म उशीरा प्राप्त झाल्यास किंवा गहाळ झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

५) जाहिरातीव्दारे प्रसिध्द केलेल्या कच्ची औषधी द्रव्ये व पॅकीग मटेरियलचे परिणाम कमी अधिक करण्याचा अथवा निविदा पूर्णपणे रद्य करण्याचा अधिकार अधिष्ठाता शासकिय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा,नांदेड यांनी राखून ठेवला आहे.

६) निविदा भाग१ दिनांक २६.०२.२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता अथवा समिती निश्चीत करेल अशा नंतरच्या दिनांकास अधिष्ठाता,शासकिय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा,नांदेड यांच्या कार्यालयात उघडण्यांत येईल. लिफापा क्रमांक १ उघडतांना निविदाकार किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणे आवश्यक राहिल.

७) निविदा सादर करतांना किंवा उघडतांना उपस्थित राहणा-या निविदाकारांस किंवा प्रतिनिधीस शासनाकडून प्रवास भाडे किंवा इतर भत्ते दिले जाणार नाही.

## निविदा मार्गदर्शक :-

निविदाकारांनी दोन लिफापे पध्दतीनूसार आपले निविदा विहीत पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे. प्रस्तूत सूचनेनूसार निवेदाकारांनी त्यांच्या निविदा आवश्यक त्या कागदपत्रासह सादर केल्या नाहीतर अशा निविदा लिफापा क्रमांक १ उघडण्याच्या दिवशी च रद्य करण्यांत येतील. समिती ग्राहय धरणार नाही व अशा निविदा त्याबाबत निविदाकारांचे अभिवेदन व तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

अतएंव निविदाकारांनी कटाक्षाने निविदा सादर करतांना खालील दिलेल्या सूचनेनूसारच निविदा पूर्ण करुन सादर करणे आवश्यक आहे.

अ) तांत्रीक लिफापा क्रमांक १ :-

१) निविदाकारांनी या लिफाप्यावर स्वच्छ अक्षरांत लिफापा क्रमांक १ तांत्रीक लिफापा असे नमूद करावे. व त्यामध्ये केवळ खालील नमूद केलेल कागदपत्रे सादर करावीत.

2) विक्रीकर भरल्याचे मार्च २००९ अखेरचे प्रमाणपत्र व विक्रीकर नोदंनी प्रमाणत्र.

3) निविदा सोबत भरावयाचा इ.एम.डी. रक्कमेचा डिमांड ड्राप्ट अधिष्ठाता,शासकिय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा,नांदेड यांच्या नांवे कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅंकेचा जोडणे आवश्यक आहे. अनामत रक्कम भरण्यापासून सूट असल्यास अशा निविदाकारांनी संबधित प्राधिकरणांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

4) निविदाकारांनी कच्ची औषधी द्रव्ये पूरवठा बाबत अनुज्ञाप्ती (लायसन्स) / परवाना/ दुकानांचे नोंदनी क्रमांक, चारित्र्य प्रमाणपत्र ,अनुभव प्रमाणपत्र, इतर संस्थेस पूरवठा केल्यास त्याचा तपशिल जोडणे आवश्यक आहे.

5) लिफापा क्रमांक १ सोबत सादर करण्यांत येणारे कागदपत्रे सांक्षाकित असणे बंधनकारक आहे.

6) कच्ची औषधी द्रव्ये व पॅकीग मटेरियलचा पूरवठा फ्रि डिलेव्हरी (एफ.डी.) फ्री ऑन रेल्वे (एमओआर) डेस्टीनेशने इत्यादी संदर्भातील घातलेल्या अटी.

7) कच्ची औषधी द्रव्ये पूरवठा केल्यानंतर कच्ची द्रव्याचे प्रयोगशाळेत परिक्षण केल्यानंतर गुणात्मक व चांगल्या दर्जाचे औषधी तपासण्या अंती गुणात्मक व चांगल्या प्रकारचे आढळून आल्यास सदरील द्रव्ये

समितीच्या संमतीने स्विकारण्यांत येतील.अन्यथा सदरील द्रव्ये परत करुन नवीन द्रव्ये पूरवठा करणे आवश्यक बंधनकारक राहिल.

8) कच्ची औषधी द्रव्ये व पॅकीग मटेरियल समितीने पसंत केल्यानंतर पूरवठा केलेल्या वस्तूंचे देयक अदा करण्यांत येइल.

9) वेगवेगळया द्रव्यांचे नावांसह लेबल व वेगवेगळे पॅकीग करुन वस्तूंचा पूरवठा करणे आवश्यक राहिल.

10) लिफापा क्रमांक १ उघडल्यानंतर व निविदेतील अटीची पूर्तता झालेली असल्यास खरेदी समिती निविदा भाग-२ उघडण्यासाठी , संचालक स्तरावरील निविदा निवड समिती समोर दिनांक ०१.०३. २०१० किंवा समितीने निश्चीत करेल त्या तारखेस आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई येथे उघडण्यांत येतील. त्यानंतर निविदा भाग-२ उघडून शासनस्तरावरील निविदा निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यांत येइल. शासनाची मान्यता मिळाल्यानंतर पूरवठा आदेश निर्गमित करण्यांत येइल.

11) कच्ची द्रव्ये निविदेतील वर्णनाप्रमाणे व उत्तम दर्जाचे , स्वच्छ व साफ करुनच द्रव्यचा पूरवठा करणे बंधनकारक राहिल.

12) कच्ची द्रव्याचा व पॅकीग मटेरियलचा पूरवठा पूरवठादाराने आदेश मिळाल्यापासून ( १५ ) दिवसांत पूर्णपणे आदेशात नमूद केल्याप्रमाणे पूरवठा करणे बंधनकारक राहिल. दिलेल्या पूरवठा आदेशाप्रमाणे विहीत मुदतीत द्रव्याचे / वस्तूचे पूरवठा न केल्यास सदरील द्रव्ये बाजारातून खरेदी करण्यांत येइल व सदरील फरकाची रक्कम आपल्याकडून वसूल करुन आपण निविदेच्या अटी व शर्तीचा भंग केल्यामूळे पूरवठादाराचे नांव शासनाच्या काळया यादीत समाविष्ट करण्यांत येइल. तसेच दंडनीय कार्यवाही करण्यांत येइल.

13) निविदाकारांनी स्वतःच्या निविदेतील विनिर्देशीची (स्पेसिफिकेशन) प्रत्येक मुदयानूसार निवेदेतील तांत्रीक लिफाप्यामध्ये देणे आवश्यक आहे

| निविदा चौकशी विनिदेशाबात परिछेद | निविदाकाराने निविदेमध्ये प्रस्तावित केलेल्या वस्तूचे तत्सम विनिर्देश उत्पादकाच्या नावांसह | निविदानुसार विनिर्देशाची पुर्तता होते किंवा नाही. | निविदा नसल्यास विनिर्देशाब |
|---|---|---|---|
| | | | |

## ब) व्यापारी लिफापा क्रमांक २ :-

या लिफाप्यामध्ये निविदाकारांनी स्वतःच्या नावांने खरेदी केलेले निविदा फॉर्म व त्यात समाविष्ट असणा-या बाबीसाठी त्याने प्रस्तूत केलेले करारपत्र स्वतः च्या स्वाक्षरीने सादर करावे. या लिफाप्यावर लिफापा क्रमांक -२ असा उल्लेख करणे आवश्यक असून त्यामध्ये निविदेचा दर अटी व शर्ती (मूळ किंमत, कर,एफ.डी.एफ.ओ.आर.डिस्टीनेशन चार्जेस इत्यादी ) नमूद करणे आवश्यक आहे. या दरपत्रकात खाडाखोड , गिरवीलेले आकडे इत्यादी बाबी कटाक्षाने टाळाव्यात. खाडाखोड झालेल्या अशा खाडाखोडी निविदाकारांनी सांक्षाकित कराव्यात. यामध्ये फक्त या कार्यालयातून खरेदी करण्यांत आलेली निविदा फॉर्म व दरपत्रकातील प्रत संबधीतांनी त्यांचे याबाबतचे दर अक्षरी व अंकी नमूद करुन सादर करावे. निविदा मूळ खरेदीदारांनी भरणे आवश्यक आहे. ते इतरांस हस्तांतरीत करता येणार नाही. अशाप्रकारे सर्व कर्ष पूर्ण केलेल्या निविदा पत्र वरिल लिफाप्यामध्ये घालून माहोरबंद करावे. मोहरबंद क्रमांक १ व २ पून्हा एकत्रीत रित्या वेगवेगळया लिफाप्यात घालून सिल करावेत. व त्यावर डाव्याबाजूस कच्ची द्रव्ये किंवा पॅकीग मटरियलचे नांव , क्रमांक , उघडण्यांची तारीख नमूद करावेत. त्याचप्रमाणे निवदाकारांचे नांव व पत्ता डाव्याबाजूस लिफाप्यावर खाली

लिहावे. त्यावर अधिष्ठाता शासकिय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा,नांदेड असा पत्ता लिहावा.

निविदा उपरोक्तपणे नमूद करुन विहीत पध्दतीनूसार न पाठविल्यास ग्राहय धरल्या जाणार नाहीत. विहीत निविदा फॉर्म नमूद केलेल्या नापरतावा किंमतीत उपलब्ध होतील याची नोंद घ्यावी.

मोहोरबंद लिफापे, अधिष्ठाता यांचे कार्यालयात विहीत तारखेत व विहीत वेळेत पोहचतील अशा बेताने पाठवावीत.

लिफापा क्रमांक १ उघडतांना लिफापा क्रमांक २ उघडण्यांची तारीख व वेळ तसेच स्थळ ही जाहीर करण्यांत येइल.

निविदाधारकांनी निविदा दाखल करण्यापूर्वी सर्व अटी व शर्तीचे नियम व सर्व सूचनांचे अवलोकन करुन निविदा दाखल कराव्यात. जेणेकरुन परिपूर्ण निविदा स्विकृत करणे सोयीस्कर होइल.

कच्ची द्रव्ये व पॅकीग मटेरियलचे निविदा भरतांना प्रत्येक कच्ची द्रव्यांचे दोन नमूने (सॅम्पलस) (मुळाक्षरे प्रमाणे) वेगवेगळया पॅकीग मध्ये देणे आवश्यक आहे. तसेच पॅकीग मटेरियलचे प्रत्येकी एक सॅम्पल देणे बंधनकारक राहिल.

निविदा मंजूर झाल्यानंतर अनामत रक्कम मंजूर दराचे ५ टक्के चलनाव्दारे बॅंकेत भरणा करणे आवश्यक राहिल. एक अथवा सर्व निविदा स्विकारणे किंवा नाकरण्याचा अधिकार अधिष्ठाता, शासकिय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा,नांदेड यांनी राखून ठेवले आहेत.

अधिष्ठाता
शासकिय आयुर्वेदिका व युनानी रसशाळा
नांदेड